दिव्य मराठी भुसावळ 28-07-2025

# आमोदे येथे विद्यार्थ्यांना दिले सायबर सुरक्षेचे धडे

प्रतिनिधी | आमोदे

आमोदा येथील घ.का.विद्यालयात पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना 'सायबर सुरक्षा' या विषयावर जळगाव येथील वैष्णवी पाटील आणि स्नेहल पाटील यांनी मार्गदर्शन केले.

सध्याच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्या अनुषंगाने पाटील भगिनींनी, मोबाइल वापरताना होणाऱ्या सामान्य चुका, सायबर जागरूकता, सायबर गुन्हे, फसव्या लिंक्स या पैलूंवर मार्गदर्शन केले. सोशल मीडिया वापरताना आपली वैयक्तिक माहिती कशी सुरक्षित ठेवायची, संशयास्पद लिंक्सवर क्लिक करणे का टाळावे याची वेगवेगळी उदाहरणे दिली. मुख्याध्यापक एस. बी. बोठे यांनीही सायबर सुरक्षेवर माहिती दिली.